प्रो. डॉ. विलास दौलतराव आवारी गौरव ग्रंथ

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे: समीक्षा



संपादक

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

:: संपादक ::

**डॉ. विलास विठ्ठल नाबदे**

सहा. प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग

अहमदनगर महाविद्यालय, अ.नगर

**पुनम पब्लिकेशन**

१२३/१, बी–ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा, दिल्ली – ११० ०५३

**भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा**

ISBN : 978-93-93366-04-7

© संपादक

**प्रकाशक :**
सौरभ सिंग
**पुनम पब्लिकेशन**
१२३/१, बी-ब्लॉक, गल्ली नं. ८, भैजनपुरा,
दिल्ली - ११० ०५३

**टाईपसेटींग :**
दिनेश बोरीकर
डाटा-लाईन कॅम्प्युटर्स,
५८३, हंसापूरी, छोटी खदान, नागपूर- १८.
मो. ९३७११५०४६७

**मुद्रक**
पुनम पब्लिकेशन
दिल्ली - ११० ०५३

किंमत : **११०० रुपये**

---

(ग्रंथातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

## अनुक्रमणिका


१. लोकशाही संकटात आहे का? भारताचा अनुभव काय सांगतो? – डॉ. विठ्ठल दहिफळे १

२. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने - "भय इथले संपत नाही." – गणेश महादेव सातपुते १६

३. भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : स्थित्यंतरे आणि वाटचाल – सविता तानाजी घोगरे २०

४. भारतीय लोकशाही - संविधान- एक सर्वांगिण शिक्षण ..... – अभिन संपत पोटे २६

५. भारतीय संसदीय लोकशाही–आव्हाने आणि उपाय – डॉ. भागवत शंकर महाले ३०

६. भारतीय लोकशाही : वाटचाल आणि भवितव्य – ममता जयराम इंदापुरे ३८

७. भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन – भोये सुरेश मुरलीधर ४२

८. भारतीय लोकशाही व मतदार वर्तन – दिपक बुधवंत ४८

९. भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन – जमीर मुम्मन इनामदार ५९

१०. भारतीय संविधानाची मूलभूत चौकट – डॉ. काळे संजय अंकुश ६६

११. भारतीय लोकशाही आणि मतदार वर्तन – डॉ. शेख वहिदा अब्दुल रज्जाक, गीतांजली शंकरराव चव्हाण ७३

१२. भारतीय लोकशाही व मतदाराचे वर्तन – शिवलाल कांतीलाल शिंदे ७८

१३. भारतीय लोकशाही आणी मतदार वर्तन – मोहिनी पांडुरंग झिंजुर्डे ८२

१४. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने – गायत्री गणेश राऊत ८४

१५. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने – प्रा. डॉ. राजकुमार रिकामे – चंचल मट्टू ८८

१६. भारतीय लोकशाही पुढील समकालीन आव्हाने – नकुल पोपट खवले ९७

१७. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने – दाते सुप्रिया सिताराम १०२

१८. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने – डॉ. रविराज अंबादास वटणे १०७

१९. आर्थिक लोकशाहीची गरज : आव्हाने आणि भवितव्य – डॉ. संदीप इरोळे ११०

२०. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने – महालक्ष्मी सुभाष ठुबे ११९

२१. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने – नवनाथ विठोबा नागरे १२३

२२. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने – रवी साहेबराव गायकवाड १२६

२३. भारतीय लोकशाहीची आव्हाने: संरक्षण- धोरणातील बदल आणि भविष्य – डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे १३०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४. | भारताचे संविधान व लोकशाही | – | नामदेव अशोक पवार<br>कैलास विठ्ठल शिंदे | १३३ |
| २५. | 'भारतीय लोकशाहीचा व्यवहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार' | – | डॉ. गणेश सुकदेव रोडे | १३८ |
| २६. | भारतीय लोकशाही आणि सामाजिक परिणाम | – | डॉ. नंदकिशोर उगले | १४७ |
| २७. | लोकशाही पुढील आव्हाने | – | डॉ. अभिजित पाटील | १५२ |
| २८. | लोकशाही : एक विचारप्रणाली | – | डॉ. प्रमोद राजेंद्र तांबे,<br>डॉ. सुवर्णा रामदास गारुडकर | १६० |
| २९. | भारतातील लोकशाहीचे वास्तव | – | विजया अशोक कोळेकर | १६७ |
| ३०. | भारतीय लोकशाही आणि पक्षीय वाटचाल | – | ठोकळ रमेश गणपत<br>डॉ. काळे संजय अंकुश | १७३ |
| ३१. | भारतीय लोकशाहीचे संरक्षण | – | अरूण अंबादास पोटे,<br>दिपक खुर्चे | १८८ |
| ३२. | भारतीय लोकशाही आणि निवडणुका | – | हारदे चंद्रकांत गोरक्षनाथ | १९१ |
| ३३. | भारतीय लोकशाही मूल्यव्यवस्था : धर्माधिष्टीत सत्तेची स्पंदने | – | डॉ. श्रीकांत देशमुख | १९५ |
| ३४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत भारतीय लोकशाही आणि सद्यस्थिती | – | कु. प्रणिता अरुण पारखे | २०३ |
| ३५. | महाराष्ट्राच्या लोकशाही राजकारणाची वाटचाल – १९६० ते २०२२ | – | डॉ. राजेंद्र दिलीप आगवाने | २०८ |
| ३६. | जागतिकीकरणानंतर भारतातील लोकशाहीचा प्रवास: पेसा कायद्याच्या निमित्ताने | – | खोकले डी. एल. | २१८ |
| ३७. | भारतीय लोकशाही आणि लोकसभा सार्वत्रिक निवडणुका | – | अर्चना फुलारी | |
| ३८ | भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | – | प्रो. डॉ. राजकुमार रिकामे<br>विकास सुभाष नालकर | २३८ |
| ३९. | यशस्वी भारतीय लोकशाहीचा मार्ग: एक शोध | – | श्याम निवृत्ती गुळवे | २४३ |
| ४०. | भारतीय लोकशाही आणि जागतिकीकरण | – | वीरेंद्र शंकर धनशेट्टी | २४७ |
| ४१. | भारतीय लोकशाहीचा विकास | – | डॉ. संभाजी तनपुरे | २५६ |
| ४२. | भारतीय राजकीय व्यवस्था | – | डॉ. एकनाथ सिताराम निर्मल | २६२ |
| ४३. | अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना | – | डॉ. सुरेश देवरे | २६७ |
| ४४. | भारतीय पक्ष पद्धतीची वाटचाल एक चिकित्सक अभ्यास | – | ए. बी. राऊत | २७३ |
| ४५ | महाराष्ट्राच्या राजकारणाचा आढावा | – | फलके ए.बी. | २७७ |

:: ३१ ::

# भारतीय लोकशाहीचे संरक्षण

अरूण अंबादास पोटे
दिपक खुर्चे
गु. मा. दां. कला, भ.बा.वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, सिन्नर

लोकशाही या शब्दाचा सूक्ष्म पद्धतीने विचार केला तर लोकशाही म्हणजे लोकांनी निर्माण केलेली अशी शासन व्यवस्था की ज्यामधून सामाजिक कल्याण होईल आणि कोणत्याही व्यक्तीवर अन्याय होणार नाही अशी प्रणाली आहे लोकशाही शासन व्यवस्थेवर अनेक विचारवंतांनी आपले विचार मांडलेले आहे तरीही लोकशाही शासन व्यवस्थेत मतभेद असताना दिसून येतात आज जगात विकसित विकसनशील व अविकसित राष्ट्रांनी लोकशाही शासन व्यवस्थेचा अवलंब केलेला आहे त्यानुसार आपल्या देशातील लोकांचे कल्याणकारी विकास करताना दिसतात परंतु या व्यवस्थेचा उगम केव्हा झाला याकडे बघूया जगामध्ये प्रथमता लोकशाही भगवान गौतम बुद्ध यांच्या कालखंडात सुरू झाली त्यानुसार राज्यांचा कारभार चालत असे त्यालाच वैशालीचे गणराज्य संबोधले जाते परंतु लोकशाही शासन व्यवस्था अन्थेन्सच्या नगरराज्यापासून मानले जाते परंतु अन्थेन्सच्या नगर राज्यातील लोकशाही शासन व्यवस्था तेथील सामाजिक घटकांवर संकुचित प्रभाव टाकत होती म्हणूनच जगामध्ये खऱ्या अर्थाने लोकशाहीचा विचार सतराव्या शतकापासून झाला युरोपियन राजेशाही मुळे प्रजेवर अन्याय अत्याचार होत होता त्यामुळे राजेशाहीला लोक कंटाळले व गुलाम म्हणून जगण्यापेक्षा मरण पत्करणे योग्य आहे याच भूमिकेतून राजेशाहीला विरोध झाला प्रत्येक व्यक्तीला या भूतलावर जगण्याचे स्वातंत्र्य अधिकार निसर्ग अधिकार आहेत त्यावर कोणत्याही व्यक्तीची मालकी नाही हा विचार प्रखरतेने लोकांतून पुढे येऊ लागला त्यातूनच लोकशाहीचा उगम झाला यामध्ये इंग्लंड मधील रक्त विहिणक्रांती अमेरिकन राज्यक्रांती फ्रान्स राज्यक्रांती या तीन महत्त्वपूर्ण प्रसंगामुळे लोकशाहीला अधिक चालना मिळाली औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात कामगार वर्ग निर्माण झाला शेती करणारा मोठा वर्ग आता एका छताखाली एकत्र येऊ लागला त्यामुळे त्यांच्यात संघटन निर्माण झाले शैक्षणिक प्रगती झाली आणि लोकशाहीची अंकुरे अधिक बळकट होत गेली आणि त्याचा विस्तार अशा खंडातही पोहोचला लोकशाही म्हणजेच अशी व्यवस्था की ज्यात धर्म जात श्रेष्ठ कनिष्ठ गरीब श्रीमंत कुच नीच या संकल्पनांना कोणताही थारा न देता मानवी कल्याणाचा विचार होय

**भारतात लोकशाहीचा विकास :**

भारतावर अनेक परकीय देशांनी आक्रमण करून शासन केले शेवटी ब्रिटिशांच्या राजवटी पासून भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आणि भारतीय समाजाचा विचार आधारे

लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला गेला भारतातील सामाजिक आर्थिक राजकीय धार्मिक सांस्कृतिक घटकांचा विचार करून संविधानात प्रकटीकरण झालेले आहे भारतीय संविधानाने लोकांचे सार्वभौमत्व निर्विवाद पणे मान्य केलेले आहेत संविधानाच्या प्रास्ताविकेतच म्हटले आहे आम्ही भारताचे लोक भारतीय लोकशाही न्याय स्वातंत्र्य समता बंधुता या मूल्यांच्या आधारित सवर्धित करण्याचा प्रयत्न करू असा संकल्प करतो लोकशाही प्रणालीमध्ये अधिकाधिक लोकांनी सहभाग घेऊन जनहिताच्या दृष्टीने कल्याणकारी व्यवस्था निर्माण करू लोकहित साध्य केली जाते त्यामुळे समाजाचा गावाचा तालुक्याचा जिल्ह्याचा राज्याचा देशाचा विकास अधिक गतीने होतो परंतु आज अनेक घटकांमुळे भारतीय लोकशाहीला तडा जाण्याची शक्यता आहे त्यामुळे लोकशाहीचे संरक्षण करणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे यामध्ये सर्वांचा समावेश असणे आवश्यक आहे तरच लोकशाही बद्दल नवीन राज्यक्रांती घडवून येऊ शकते त्यासाठी पुढील घटकांपासून लोकशाही शासन प्रणालीचे संरक्षण होणे गरजेचे आहे.

**१) राजकीय गुन्हेगारी आणि हिंसाचार :** भारतामध्ये राजकीय पक्षांकडून धार्मिक जातीय प्रादेशिक घटक आंदोलने आरोप प्रत्यारोप सत्ता हस्तगत करण्यासाठी समाजामध्ये हिंसक वातावरण निर्माण केले जाते त्यातून राजकीय पक्ष फायदा साधला जातो त्यामुळे सामान्य जनतेवर परिणाम होतो मुळेही लोकशाहीला तडा जातो म्हणून राजकीय गुन्हेगारी आणि हिंसाचार यापासून लोकशाही शासन प्रणालीचे संरक्षण होण्यासाठी समाजामध्ये वैचारिक जागरुकता निर्माण होणे गरजेचे आहे

**२) आधुनिक तंत्रज्ञानाचा राजकीय क्षेत्रातील दुरुपयोग :** आज राजकीय घटकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग सत्ता मिळवण्यासाठी होत आहे आपल्या पक्षाचे महत्त्व व दुसऱ्या पक्षां बद्दल द्वेष समाजामध्ये पसरविला जातो त्यामुळे समाजामध्ये संभ्रम निर्माण होऊन दिशाभूल होतो आणि देशा तील समाज कल्याणच्या दृष्टीकोनातून लोकशाही शासन व्यवस्था अयशस्वी होते म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग होऊन अयोग्य घटकांसाठी निर्बंध लादणे आवश्यक आहे

**३) भ्रष्टाचार :** भ्रष्टाचार ही एक गंभीर सामाजिक समस्या आहे त्यामुळे सामाजिक नैतिक मूल्यांचा ऱ्हास होतो नियमहिनता असत्यवादिता पारदर्शकता या तीन गोष्टी बऱ्याचदा अनैतिकतेच्या गाभ्याशी असल्याचे दिसते. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल च्या करप्शन पर्सेप्शन इंडेक्स च्या अहवालानुसार भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारत १८० देशांमध्ये ८५ नंबर ला आहे राजकीय क्षेत्र निवडणूका बांधकाम व्यवसाय शेअर व बँकिंग क्षेत्र उद्योग रस्ते इत्यादी क्षेत्रांमध्ये राजकीय घटकांचा हस्तक्षेप होऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो यामधुन सामाजिक कल्याण मध्ये अनेक प्रश्न निर्माण होतात यामधुन मोजक्याच मूठभर लोकांकडे सत्ता जाते कालांतराने समाज गुलामगिरीकडे लोटला जातो म्हणून लोकशाही शासनाचे संरक्षण होणे गरजेचे आहे

**४) निरक्षरता :** पुरुष साक्षरता ८२.१४% भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ७४.४% लोकसंख्या सुशिक्षित आहे यामध्ये तर महिला साक्षरता ६५.४६% आहे जवळजवळ २५% लोकसंख्या आजही निरक्षर आहे याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षणाची अपूर्ण सुविधा जातीयवाद गरीबी अंधश्रद्धा ही कारणे आहेत त्यामुळे निवडणुकांमध्ये अशा लोकांचा सहभाग अजूनही नाही त्यामुळे शैक्षणिक जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे त्यातूनच लोकशाही बळकट होऊ शकते

**५) गरिबी :** भारत हा विकसनशील देशांमध्ये गणला जातो आजही ग्रामीण भागांमध्ये मूलभू सुविधांची पूर्तता नाही देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ११% लोकसंख्येचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नात ८ टक्के तर एक टक्के लोकसंख्येचा वाटा २२ टक्के आहे तर तळातील लोकसंख्येचा वाटा १३% आ यावरून असे दिसून येते की आजही भारतातील लोकसंख्या दारिद्र्य गरिबीत आहे त्यामुळे याच फायदा राजकीय घटकाकडून होताना दिसतो निवडणूकांच्या वेळेत या लोकांना आमिष दाखवून म मिळवली जातात आणि यामुळेच लोकशाहीला मोठा धक्का बसतो म्हणून गरिबी मिटवण्यासाठ समाजातील घटकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

**६) जातीयवाद व सांप्रदायिकता :** भारतातील राजकारण हे जातीय राजकारण म्हणून आज ओळखले जाते जात, धर्म, वंश, परंपरा यावर राजकीय घटकांकडून आघात होतो आणि समाजामध्ये हिंसात्मक वातावरण निर्माण होते यातुन असहिष्णुता संकल्पनेला चालना मिळू शकते त्याचबरोब लोकशाहीतील न्याय स्वातंत्र्य समता बंधुता ही पायमल्ली तुडवली जातात आणि समाजामध्ये सरका विरोधी भूमिका निर्माण होते म्हणून राजकीय घटकांकडून अशा प्रकारची राजनिती केली जाऊ नये यासाठी नागरिकांनी वैचारिक दृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे तरच लोकशाहीचे संरक्षण होउ शकते

**७) लोकांमधील राजकीय उदासीनता :** राजकीय उदासीनता निर्माण होण्यामागे राजकीय घटक प्रामुख्याने कारणीभूत आहे भ्रष्टाचार बेरोजगारी अन्याय अत्याचार राजकीय शक्ती हे सर्व वर्षानुवर्ष सुरू असल्यामुळे त्याला विरोध करणे शक्य नाही अशी भावना सामान्य नागरिकांमध्ये निर्माण होते या कारणांमुळे सामान्य नागरिक याकडे दुर्लक्ष करत असतो आणि राजकीय उदासीनता निर्माण होते परंतु सामान्य नागरिकांनी या घटकाकडे दुर्लक्ष केले तर राजकीय सत्तेत एकाधिकारशाही किंवा हुकूमशाही निर्माण होऊ शकते त्यामुळे लोकशाही शासन प्रणाली धोक्यात येते म्हणून लोकांनी जागृतक राहून लढा देणे आवश्यक आहे.

वरील सर्व घटकांमुळे लोकशाही शासन प्रणालीला धोका निर्माण होऊ शकतो म्हणून लोकशाहीचे संरक्षण करण्यासाठी सामान्य जनतेने लढा देणे आवश्यक आहे त्यासाठी कायदेविषयक ज्ञान निरक्षरता गरीबी अंधश्रद्धा जातीय व संप्रदायिक वाद भ्रष्टाचार तंत्रज्ञानाचा दुरुपयोग राजकीय उदासीनता इ. मूळापासून नष्ट करणे आवश्यक आहे त्याचप्रमाणे उच्च वैचारिक पातळी समाजामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे

□□□

प्रो. डॉ. विलास दौलतराव आवारी गौरव ग्रंथ

# भारतीय लोकशाहीची ७५ वर्षे : समीक्षा

संपादक **डॉ. विलास विठ्ठल नाबदे**



स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारतीय लोकशाहीच्या निरंतर प्रवासात शासन, राजकीय पक्ष, संयुक्त आघाडी, निवडणूक आयोग, न्याय मंडळ, प्रसारमाध्यमे आणि जनतेचा वाढता सहभाग इ. मुळे लोकशाहीची प्रक्रिया स्थिर होत आहे, ही लोकशाहीची वाटचाल यशस्वी होत असताना विविध स्थित्यंतरानी भारतीय लोकशाहीपुढे आव्हाने निर्माण केली ती आव्हाने घटनात्मक पद्धतीने सोडवित व अंतिम, जनता अधिमान्यतेमुळे भारतीय लोकशाहीने ७५ वर्ष पूर्ण केली सदर पुस्तकातील बहुस्थरीय समीक्षा नव्या पिढीला निश्चित उपयुक्त ठरेल

**डॉ. पी. डी. देवरे**

माजी अध्यक्ष महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद

₹1100/-

ISBN 978-93-93366-04-7

Poonam Publications
123/1, B-Block, Gali No. 8, Bhajanpura
Delhi-110 053 (India)
E-mail: poonampublications15@gmail.com
Mob.: 9968065744, 9716644956